## प्रेस नोट

ला.प्र.वि,वाशिम.
दि.०४/०२/२०२६

## भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा अंतर्गत दोषसिध्दी

**आरोपी लोकसेवक** १) सुभाष मोतीराम इंगळे सहायक लेखा अधिकारी वर्ग–३ जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग वाशिम
२) निलेश मधुकर लंगोटे कनिष्ठ सहायक वर्ग–३ जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग

यांना पोस्टे वाशिम जि.वाशिम अप नं. ३०५२/२००८ कलम ७,१२,१३(१)(ड) सह कलम १३(२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मध्ये विद्यमान जिल्हा व सत्र न्यायालय वाशिम यांनी आज **दि.०४.०२.२०२६** रोजी शिक्षा दिल्या बाबत.

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंध विभाग/घटक** | अमरावती परीक्षेत्र विभाग.<br>लाप्रवि घटक वाशिम |
| **पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक** | पोस्टे वाशिम जि.वाशिम अप नं. ३०५२/२००८ |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | कलम ७,१२,१३(१)(ड) सह कलम १३(२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| **आरोपी लोकसेवक नाव, वय, कार्यलय पत्ता** | १) सुभाष मोतीराम इंगळे सहायक लखा अधिकारी वर्ग–३ जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग वाशिम<br>२) निलेश मधुकर लंगोटे कनिष्ठ सहायक वर्ग–३ जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग वाशिम |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | २०,०००/–रूपये लाचेची मागणी करून दोन हप्त्यात २०,०००/–रूपये स्वीकारले |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम.** | दोन हप्त्यात अनुक्रमे १७,०००/–रूपये व सापळा कारवाई दरम्यान ३०००/– रूपये स्वीकारले |
| **थोडक्यात हकिकत.** | गुन्हयातील हकिकत अशी की, तक्ररदार वय वर्ष ४२ यांच्या गावासाठी भारत निर्माण अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या निधीचा तिसरा टप्पा मिळणे करिता आरोपी लाकसेवक क्रमांक १ व २ यांनी २०,०००/– रूपये लाच मागणी करून सुरूवातीला तक्ररदार यांचे कडुन १७,०००/– रूपये रोख स्वरूपात घेवुन पुन्हा ३०००/–रूपये मागणी करून दि.३०.०५.२००८ सापळा कारवाई दरम्यान पैसें स्वीकारले त्यांचे कडुन लाचेची रक्कम जप्त करण्यात आले असल्याने त्यांचे विरूध्द दि.३१/०५/२००८ रोजी पोलीस स्टेशन वाशिम जि.वाशिम येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br><br>आज रोजी मा. विद्यमान जिल्हा व सत्र न्यायालय वाशिम यांनी आरोपी क्रमांक १. यांना भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अन्वये ४ वर्षे शिक्षा व २५०००/–रूपये दंड, तसेच कलम १३ अन्वये ५ वर्षे सक्त मजुरी व २५०००/–रूपये दंड असा एकुण ५००००/– रूपये दंड तसेच आरोपी क्रमांक २ यांना भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अन्वये ४ वर्षे शिक्षा व २५०००/–रूपये दंड, तसेच कलम १३ अन्वये ५ वर्षे सक्त मजुरी व २५०००/–रूपये दंड असा एकुण ५००००/– रूपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.<br><br>सदर केस मध्ये अतिरिक्त सरकारी अभियोक्ता मा. श्रीराम नारायण काळु यांनी सरकार तर्फे कामकाज पाहिले आहे. |
| **कोर्ट पैरवी अधिकारी व अमंलदार** | १) पोलीस उप अधिक्षक जगदीश परदेशी (ट्रायल ऑफीसर)<br>२) पोहवा समाधान मोघाड<br>३) महीला अमंलदार उज्वला गायकवाड<br>४) पोशि सतीश गुळदे |
| **मार्गदर्शन** | **१).मा. श्री बापू बांगर, पोलीस अधिक्षक ला.प्र.वि अमरावती, परीक्षेत्र अमरावती**<br>**२).मा. श्री सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि अमरावती, परीक्षेत्र अमरावती** |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम तर्फे नागरीकांना आवहान करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोक सेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय वाशिम डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, एल.आय.सि. कार्यालयामागे वाशिम.
संकेत स्थळ- acbmaharashtra.gov.in
ई-मेल- 1. dyspacbwashim@mahapolice.gov.in, 2. dyspacbwsm@gmail.com
ऑनलाईन तक्रार- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक-१०६४/९९२२६७१०६४
दुरध्वनी क्रमांक-०७२५२-२३५९३३,
व्हॉस्टअप क्रमांक-९९२२६७१०६४

जगदीश परदेशी
पोलीस उपअधिक्षक ला.प्र.बि.
वाशिम जिल्हा वाशिम